१०

# विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक अनुभव यातील सहसंबंधाचा अभ्यास

**रोहन मोहन कांबळे**
एम.एड्.विद्यार्थी, शिक्षणशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ.

**डॉ.अश्विनी करवंदे.**
सहाय्यक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विभाग
मुंबई विद्यापीठ.

सारांश :

मचध्यमिक शाळांतील विद्याथांर्ची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यातील सहसंबंधाचा अभ्यास यातील संशोधन करण्यात आले. प्रस्तुत संशोधनात वर्णनात्मक पध्दतीचा वापर करुन नमुना निवडीसाठी त्रिस्तरीय नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला. सदर संशोधनात असेआढळून येते की माध्यमिक शाळांतील विद्यार्थांच्या शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभवात कमी प्रतीचा ऋणात्मक लक्षणीय सहसंबंध आहे. माध्यमिक शाळांतील विद्यार्थामधील शैक्षणिक दिरंगाई मुर्लीपेक्षा मुलग्यांमध्ये जास्त आहे. तर कौटुंबिक जीवन अनुभवात मुलग्यांपेक्षा मुलींमध्ये जास्त आहे. माध्यमिक शाळांतील मुलगे व मुली यांची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यांच्या सहसंबंधात लक्षणीय फरक आढळला नाही.

**प्रस्तावना :**

आजच्या युगात शिक्षणाला फार महत्त्वाचे स्थान लाभलेआहे. कारण शिक्षणाचे व्यक्ती विकास होतो व व्यक्तीला आदराचे स्थान मिळते. पण कोणतेही कार्य करत असताना त्या कायार्त काहीना काही अडथळे निमार्ण होतात. आणि ते कार्य पूणत्वास नेण्यासाठी विलंब होतो. यासाठी अनेक प्रकारची कारणे कारणीभूत असतात.या आधारावरील कारणांचे किंवा समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रस्तुत संशोधन शैक्षणिक दिरंगाई आणि कौटुंबिक जीवन अनुभव यातील सहसंबंधातून करत आहे.

दिरंगाई हा शब्द प्रथम एडवर्ड हॉल्स (१९५४) यांच्या युनियन ऑफ द नोबल ॲन्ड इलस्टर फॅमिलिज ऑफ लॅंडकॅस्टर ॲंड यॉर्क या पुस्कात आढळतो.

व्युत्पत्तीशास्त्रानुसार दिरंगाई म्हणजे इग्रंजीमध्ये प्रोकॅस्टीनेशन हा शब्द मुळ लॅटिन शब्द प्रोकॅस्टीनस पासून तयार झाला आहे. दिरंगाई हे व्यक्तीचे एक असे वतर्न आहेकी जे एखादे काम नंतर करणे किंवा एखादी क्रिया पुढे ढकलणे असे दशविर्ते. तसेच शैक्षणिक कार्यात दिरंगाई होण्यासाठी कार्याची कठीणता वेळेची कमतरता ज्ञानाची किंवा कौशल्याची कमतरता आणि भीती ही कारणे कारणीभूत असतात. मुलांच्या शारिरीक़ भावनिक़ मानसिक व सामाजिक विकासाचा पाया हा सुदृढ व निकोप वातावरणावर अवलंबून असतो.हा पाया मजबूत करण्यासाठी चांगल्या कौटुंबिक अनुभवाची गरज असते. पण त्या कौटुंबिक जीवन अनुभवात शैक्षणिक प्रोत्साहन कौटुंबिक वातावरण समवयस्क मित्रांचा सहभाग आणि अभ्यासेत्तर उपक्रम या घटकांचा समावेश असतो.

पण एकविसाव्या शतकातील कुटुंब पध्दती पहाता स्वतंत्र कुटुंब पध्दतीचा समावेश जास्त होत आहे. त्यामुळे व्यक्तीला चांगल्या अशा कौटुंबिक जीवन अनुभव देणे गरजेचे आहे. म्हणून माध्यमिक स्तरावर शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यातील सहसंबंधाचा अभ्यास यावर कमी प्रमाणात संशोधन झाल्याचे आढळते. त्यामुळे सदर चलांशी संबंधित संशोधन संशोधकानी केलेआहे.

**संशोधनाची चले:**

१. स्वाश्रयी चले : कौटुंबिक जीवन अनुभव
२. आश्रयी चले : शैक्षणिक दिरंगाई

**कियात्मक व्याख्या**

**१. शैक्षणिक दिरंगाई :**

शैक्षणिक दिरंगाई म्हणजे व्यक्तिचे ध्येयेलक्ष्य आणि वास्तविक वतणूर्क यांच्यामध्ये अशा तऱ्हेने नकारात्मक प्रभाव निर्माण करते की ती व्यक्ति कोणतेही कार्य उशीरा करते किंवा टाळते.

(बांईडर, २०००)



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013, ISSN : 2319-5525

**संशोधनाची फलिते आणि चर्चा :**

**परिकल्पना १ :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दिरंगाईत लिंगानुसार लक्षणीय फरक आहे ( t = ३.०५ ०.०१स्तरावर लक्षणीय)

मुलींपेक्षा मुलग्यांमध्ये शैक्षणिक दिरंगाईचे प्रमाण जास्त आहे. कारण कदाचित मुलग्यांना अभ्यास करताना संबंधित अनेक अडथळे येत असावेत. तसेच मलगे हे अभ्यासाव्यतिरिक्त आवडीच्या कामाला ( दूरदर्शन पाहणे संगणकावरील वेळ घालवणे खेळांनाकडे लक्ष) जास्त महत्त्व देतात. मुलग्यांमध्ये असणाऱ्या अभ्यासाच्या नियोजनाचा अभाव आत्मविश्वासाची कमतरता अपयशाची भीती तणाव यांचे प्रमाण जास्त असते. म्हणून मुलग्यांमध्ये शैक्षणिक दिरंगाईचे प्रमाण जास्त असावे. या व्यतिरिक्त शैक्षणिक दिरंगाई ही केवळ वेळेचे व्यवस्थापनातील कमतरता अध्ययन कर्त्यामधील त्रुटीमुळे उद्‌भवत नाही तर गुंतागुतींचे क्लिष्ट व्यवहार बौध्दिक तसेच भावनात्मक घटकामुळे निमार्ण होत (सोलोमन रॉथब्लम१९८४)या व्यतिरिक्त शैक्षणिक दिरंगाईसाठी अपयशाची चिंता कामाप्रती विरोध परीक्षण स्वसंकल्पना गणन मदत मागण्यासाठीची चिंता हे घटक कारणीभूत असतात(ऑनवेगबझीएंथोनी२०००). कदाचित विद्यार्थ्यामध्ये शैक्षणिक कार्य करण्यात अभिरुची कमी असणे.न आवडणारे विषय आणि सभोवतालचे वातावरण या घटकांचा परिणाम शैक्षणिक दिरंगाईत होत असावा.

**परिकल्पना २ :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक जीवन अनुभवात लिंगानुसार लक्षणीय फरक आहे ( t = ३.०५ ०.०१स्तरावर लक्षणीय)

मुलग्यांपेक्षा मुलींन मध्ये कौटुंबिक जीवन अनुभवाचे प्रमाण जास्त आहे. कारण कदाचित मुलींना पालकांकडून मिळणारे शैक्षणिक प्रोत्साहन व कौटुंबिक वातावरण या गोष्टींची पूर्तता चांग्ल्या पध्दतीने होतो. तसेच मुलींना मिळणारा समवयस्क मित्रांचा सहभाग व अभ्यासेत्तर उपक्रम चांगला असतो( क्लाईमथी कुमारन २००८) म्हणून मुलींमध्ये कौटुंबिक जीवन अनुभव जास्त आढळला. त्याच प्रमाणे मुलींना त्यांच्या कुटुंबातून मिळणारे लोकशाही वातावरण आर्थिक सामाजिक परिस्थिती आणि पालकांकडून मिळणारे शैक्षणिक मागदर्शन या घटकांमुळे मुलींमध्ये कौटुंबिक जीवन अनुभव मिळतो(खाडे २००७) या सर्व गोष्टीचा विचार करुन विद्यार्थ्यांचा सवांगीर्ण विकास होऊ शकतो.

**परिकल्पना ३ :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या मुलगे आणि मुलींच्या कौटुंबिक जीवन अनुभवातील शैक्षणिक प्रोत्साहन ( t = ३.०४, ०.०१ स्तरावर लक्षणीय) कौटुंबिक वातावरण ( t = ४.३४, ०.०१स्तरावर लक्षणीय) समवयस्क मित्रांचा सहभाग ( t = २.०९, ०.०५ स्तरावर लक्षणीय) आणि अभ्यासेत्तर उपक्रम ( t = ४.९७, ०.०१स्तरावर लक्षणीय) फरक आहे.

माध्यमिक शाळांतील मुलग्यांपेक्षा मुलींना शैक्षणिक प्रोत्साहान जास्त मिळते. कारण मुलींच्या बाबतीत अभ्यासातील एकाग्रतेचे प्रमाण अभ्यासात येणाऱ्या अडचणीचे निराकरण वेळोवेळी होत असावेत. मुलींमध्ये प्रामाणिकपणा असल्यामुळे पालकवर्ग हा विद्यार्थ्याबरोबर मनोरंजनाच्या ठिकाणी जात असावेत आणि वतमानपत्रातील घडामोडींची चर्चा कुटुंबासोबत चांगल्या प्रकारे केल्याने विद्यार्थ्याना प्रोत्साहन मिळते. शैक्षणिक प्रोत्साहन घरातील वातावरणातील प्रत्येक गोष्ट आणि सृजनशीलता यांचा संबंध सकारात्मकतेने असावा. पालकांची लोकशाही प्रवृत्ती व शैक्षणिक प्रोत्साहन हे नेहमी सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले असावेत (क्राळे२००७)

माध्यमिक शाळांतील मुलग्यांपेक्षा मुलींमध्ये कौटुंबिक वातावरणाचे प्रमाण जास्त आहे. कारण मुलींना कौटुंबिक वातावरणातील पालक पाल्य आंतरक्रि -या घरातील लोकशाही वातावरण आर्थिक सामाजिक परिस्थिती व पालकांकडून मिळणारे शैक्षणिक मागदर्शन जास्त मिळत असावेत. तसेच मुली जो विचार करतात त्या विचारांची चर्चा पालकांसोबत चांगल्या प्रकारे होत असावी.जेव्हा पालक निरीक्षण करत असतील तसेच मुलांची प्रवृत्ती आणि वागणूक विकसित करण्यासाठी कौटुंबिक वातावरणतील घरगुती कृतींचा समावेश होत असतो (पावेल १९८९) तसेच विद्यार्थ्यांच्या जीवनात कौटुंबिक वातावरण हाच प्रमुख घटक नसून वेगवेगळया घटकांचा एकत्रित परिणाम होतो. कुटुंबाचा आर्थिक सामाजिक दर्जा आणि समाजिक मानसशास्त्रीय वातावरण यांचा मुलांच्या मानसिक विकासात अद्‌भूत परिणाम होतो. ( पाधी १९८९ )

माध्यमिक शाळांतील मुलग्यांपेक्षा मुलींमध्ये समवयस्क मित्रांच्या सहभागाचे प्रमाण जास्त आहे. कारण मुलींचे समवयस्क मित्रांबरोबर चांगले समायोजन होत असावेत. तसेच आपला वेळ शेजाऱ्या बरोबर चांगल्यारीतेने घालवत असतील. मुलांपेक्षा मुलींच्या समवयसकर मित्राच्या क्षमताचा विचार केला असता असे अढळून येते की, जे कुटुंब विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवू शक्ते

**२. कौटुंबिक जीवन अनुभव :**

घरातील वातावरणातून विद्यार्थ्यांनी घेतलेल्या अनुभावाव्दारे त्यांच्या कौटुंबिक मानसिक ते विषयीची जाणीव तसेच घरातील वातावरणाचा भौतिक आढावा घेणे जसे शैक्षणिक प्रोत्साहन, कौटुंबिक वातावरण , समवयरक मित्रांचा सहभाग व अभ्यासेत्तर उपक्रम हे खालील चार घटक अभ्यास करणे होय.

(क्लाईमथी , कुमारन २००८)

**अ. शैक्षणिक प्रोत्साहन :**

पालकांनी आपल्या मुलांना त्यांच्यातील असामान्य क्षमतांचा विकास करण्यासाठी आणि त्यांच्या आवडीनुसार व जिज्ञासेनुसार त्यांच्या शैक्षणिक विकास करण्यासाठी दिलेला पाठिंबा म्हणजे शैक्षणिक प्रोत्साहन होय.

**ब. कौटुंबिक वातावरण :**

मुलांच्या शारीरिक मानसिक व सामाजिक गरजांची काळजी घेऊन त्यांचा आनंददायी विकास करण्याची पालकांची प्रवृत्ती म्हणजे कौटुंबिक वातावरण होय. यात पालकांच्या काळजी विषयक व सहकार्य विषयक सर्व कार्याचा अंतर्भाव असतो.

**क. समवयस्क मित्राचा सहभाग:**

मुलांना त्याच्या समवयस्कर मित्र- मैत्रिणींशी खेळण्याची सधी देणारे कुटुंबातील लोकशाही युक्त वातावरण यात दर्शविले जाते. मित्र- मैत्रिणी सोबत खेळल्यामुळे मुलातील अनेक कौशल्यांचा विकास होतो.

**ड. अभ्यासेत्तर उपक्रम :**

कुटुंबातील सदस्यांकडून विद्यार्थ्यांना अभ्यासेत्तर उपक्रमांमध्ये भाग घेणे व त्यात निपुणता आणणे यासाठी दिले जाणारे प्रोत्साहन यांचा यात समावेश होतो. अभ्यासेत्तर विषयामध्ये निबंध स्पर्धा वक्तृव स्पर्धा, विविध खेळ व क्रीडा नाटके कर्थाकथन शालेय सहली या सर्व विषयांचा समावेश होतो.

**संशोधनाची समस्या :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांर्ची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यातील सहसंबंधाचा अभ्यास

**संशोधनाची ध्येये:**

१. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाईची अभ्यास करणे.
२. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची कौटुंबिक जीवन अनुभवाचा अभ्यास करणे.
३. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यातील सहसंबंध पडताळणे.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :**

प्रस्तुत संशोधनासाठी बृहन्मुंबईतील उत्तर, दक्षिण व मध्य मुंबई विभागातील मराठी माध्यमाच्या माध्यमिक शाळाचा समावेश करण्यात आला. मराठी माध्यमा व्यतिरिक्त इग्रंजी, हिंदी, गुजराथी व इतर माध्यमाच्या शाळांचा समावेश करण्यात आलेला नाही. प्रस्तुत संशोधनासाठी फक्त माध्यमिक शाळांमधील इयत्ता ९वी चे विद्यार्थी घेण्यात आलेले असून इयत्ता आठवी व दहावीचे विद्यार्थी घेतले गेले नाहीत.

सदर संशोधन शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव या चलांशी संबंधित असून वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग केला आहे. सदर संशोधनासाठी तयार करण्यात आलेली संशोधन साधने फक्त विद्यार्थ्यांमधून मुलगे व मुली यांच्याकडून भरुन घेण्यात आली असून यामध्ये शिक्षक पालक शिक्षकेतर कर्मचारी यांचे कडून संशोधन साधने भरुन घेतली गेली नाहीत.

**प्रस्तुत संशोधनासाठी वापरलेली पध्दती :**

संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे. यामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील कारणमीमांसा तुलनात्मक पद्धती व सहसंबंधात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे.

**संशोधनाचा न्यादर्श:**

प्रस्तुत अभ्यासासाठी संशोधकाने त्रिस्तरीय नमुना निवड पध्दतीचा वापर केला आहे.
१. संशोधकाने प्रथम स्तरावर स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने बृहन्मुंबईतील उत्तर, दक्षिण व मध्य या तीन विभागांची निवड केली.
२. व्दितीय स्तरावर स्तरीय सरल यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने बृहन्मुंबईतील मराठी माध्यमांच्या १२ शाळांची निवड केली.
३. तृतीय स्तरावर संशोधकाने ५५५ विद्यार्थ्यांची निवड प्रासंगिक न्यादर्श निवड पध्दतीने केली.

**प्रस्तुत संशोधनासाठीची संशोधन साधने:**

१. शैक्षणिक दिरंगाई पदनिश्चयन श्रेणी किली बाइंडर(२०००)
२. कौटुंबिक जीवन अनुभव प्रश्नावली कुमारन(२००८)
३.वैयक्तिक माहिती पत्रक

...



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525

नाही किंवा सकारात्मक निणर्य घेऊ शकत नाही असेविद्यार्थी स्वावलंबी आणि सक्षम बनतात(पाधी १९८९)

माध्यमिक शाळांतील मुलग्यांपेक्षा मुलींमध्ये अभ्यासेत्तर उपक्रमाचे प्रमाण जास्त आहे. कारण मुलीं मध्ये अभ्यासेत्तर उपक्रम करण्यात अभिरुची जास्त असावी.तसेच घराबाहेरील आणि शाळेबाहेरील उपक्रमात मुलींचा सहभाग जास्त असावा. (कलाइमर्थी. कुमारन २००८) तर आधुनिकीकरणाच्या वाटेवर मार्गक्र मण करत असताना जर विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून अभ्यासेत्तर उपक्रमाचे महत्त्व कळाले तर विद्यार्थ्यांचे उच्च शिक्षण घेतल्याबददल गोडी निमार्ण होऊ शकते. आणि नावीन्यतेच्या गोष्टीचा समावेश झाल्याने विद्यार्थ्यांचे हे एक सृजनशील व्यक्तिमत्त्व होऊ  शकते(कालीएथ १९८८)

**परिकल्पना ४ :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यांमध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. ( r = -०.३४३, ०.०१ स्तरावर लक्षणीय)

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक जीवन अनुभव यांमध्ये सहसंबंध ऋणात्मक कमी स्वरुपाचा आहे. याचाच अर्थ असा की कौटुंबिक जीवन अनुभव कमी तर शैक्षणिक दिरंगाई जास्त होय. कारण कौटुंबिक जीवन अनुभवातील शैक्षणिक प्रोत्साहन कौटुंबिक वातावरण समवयस्क मित्रांचा सहभाग व अभ्यासेत्तर उपक्रम हे घटक आव-श्यक असतात. या घटकाव्दारे विद्यार्थ्यांमध्ये कौटुंबिक जीवन अनुभव चांगल्या प्रकारे निमार्ण करू शकतो(कलाईमथी कुमारन २००८) विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाई कमी करता येते तसेच शैक्षणिक दिरंगाईस होण्यास वेळेच्या व्यवस्थापनातील कमतरता यामुळे उद्‌भवत नाही तर बौद्धिक तसेच भावनात्त्मक घठने मुळे निर्माण होतात.(सोलोमनत,रॉथब्लम१९८४) मुलग्यांची शैक्षणिक दिरंगाई जास्त आहे तर मुलींचे प्रमाण कमी आहे. कदाचित मुलग्यांमध्ये अपयशाची भीती कंटाळा  अभ्यासाचा तिरस्कार वाटणे आणि तणाव या घटकांचा प्रभाव जास्त दिसतो. त्यामुळे मुलग्यांमध्ये शैक्षणिक दिरंगाई जास्त असावी. तसेच माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक दिरंगाईच्या प्राप्तांकाचे ११.७८% विचलन कौटुंबिक जीवन अनुभवाशी संबंधित असावी.

**परिकल्पना ५ :**

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिरंगाई व शैक्षणिक प्रोत्साहन ( r = -०.४०९, ०.०१ स्तरावर लक्षणीय) कौटुंबिक वातावरण( r = -०.२३८, ०.०१ स्तरावर लक्षणीय) समवयस्क मित्रांचा सहभाग( r = -०.१४४, ०.०१ स्तरावर लक्षणीय) आणि अभ्यासेत्तर उपक्रम ( r = -०.२५९, ०.०१ स्तरावर लक्षणीय)यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याची शैक्षणिक दिरंगाई व शैक्षणिक प्रोत्साहन यातील सहसंबंध ऋणात्मक कमी स्वरुपाचा आहे. याचाच अर्थ असा की शैक्षणिक प्रोत्साहन कमी तर शैक्षणिक दिरंगाई प्रमाण जास्त होय. शैक्षणिक प्रोत्साहनात विद्यार्थ्याना येणारे एकाग्रतेतील अडथळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासविषयक अडचणी आणि अडचणींचे निराकरण न होणे यामुळे विदयार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळत नाही. तसेच विद्यार्थ्यानी केलेल्या चुकांचे स्पष्टीकरण पालकांनी न स्वीकारणे अशा अनेक गोष्टीमुळे विद्यार्थ्याना शैक्षणिक प्रोत्साहन मिळत नाही(कलाइमर्थी. कुमारन २००८) माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक दिरंगाईचे प्राप्तांकाचे१६.७६% विचलन शैक्षणिक प्रोत्साहनाशी संबंधित आहे.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिरंगाई व कौटुंबिक वातावरण यातील सहसंबंध ऋणात्मक कमी स्वरुपाचा आहे. याचाच अर्थ असा की कौटुंबिक वातावरण कमी तर शैक्षणिक दिरंगाई प्रमाण जास्त होय. विद्यार्थ्याना प्राथमिक अनुभव कुटुंबातच मिळत असतात तसेच कौटुंबिक वातावरणातूनच विद्यार्थ्याची जडण घडण होत असते.त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कुटुंबातून चांगले संस्कार आणि मूल्यांची रूजवणूक झाली पाहिजे. मुलांच्या शिक्षणात कुटुंबाच्या सहभागामुळे मुलांना चांगले शेरे व शाळेतील उपस्थिती वाढवण्यात मदत होते(हेडसन,बेटिया १९९४) विद्यार्थ्यांना चांगले कौटुंबिक वातावरण देण्यासाठी विद्यार्थीपालक योग्य आंतरक्रिया विद्यार्थ्याच्या मनातील भीती व समस्यांचे निराकरण होणे आवश्यक आहे(कोलिनस २००८)अशा प्रकारे कौटुंबिक वातावरण चांगले मिळाले तर शैक्षणिक दिरंगाई कमी होऊ शकते. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दिरंगाईचे प्राप्तांकाचे५.६६%विचलन कौटुंबिक वातावरणशी संबंधित आहे.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिरंगाई व समवयस्क मित्रांचा सहभाग यातील सहसंबंध ऋणात्मक कमी स्वरुपाचा आहे. याचाच अर्थ असा की



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525

समवयस्क मित्रांचा सहभाग कमी तर शैक्षणिक दिरंगाई प्रमाण जास्त होय.विद्यार्थ्यांला मिळालेले प्राथमिक शिक्षण पुरेसे नसते त्यासाठी विद्यार्थ्यांला समवयस्क मित्रांमध्ये राहून वेगवेगळया गोष्टी शिकण्यास मिळतात. त्यासाठी पालकांनी विद्यार्थ्याला समवयस्क मित्रांबरोबर अभ्यास विषयक अशा कार्यक्रमात सहभागी होण्यास प्रेरणा देणे आवश्यक आहे. तसेच एखादा शैक्षणिक उपक्रमासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या शेजाऱ्या-बरोबर किंवा सहकारी मित्रांबरोबर वेळेचे योग्य नियोजन करावे (कलाइमथी,कुमारन २००८). माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याच्या शैक्षणिक दिरंगाईचे प्राप्तांकाचे २.०९% विचलन समवयस्क मित्रांचा सहभागाशी संबंधित आहे.

माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक दिरंगाई व अभ्यासेत्तर उपक्रम यातील सहसंबंध ऋणात्मक कमी स्वरुपाचा आहे. याचाच अर्थ असा की अभ्यासेत्तर उपक्रम कमी तर शैक्षणिक दिरंगाई प्रमाण जास्त होय.कारण अभ्यासेत्तर उपक्रमामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञान अदयावत होऊ शकेल. तसेच घरातील चर्चा आणि छोट्या सभा ज्या पालकांबरोबर केल्यामुळे विद्यार्थ्याचा वैयक्तिक सामाजिक बदल आणि बौध्दिक विकास सुध्दा झाला असे निर्दशनास आले(मुरलीधरन, इर्ट १९८८) अभ्यासेत्तर उपक्रमामुळे विद्यार्थ्याचा बहुअंगी व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दिरंगाईचे प्राप्तांकाचे ६.७१%विचलन अभ्यासेत्तर उपक्रमाशी संबंधित आहे.

**संदर्भ ग्रंथी सूची**

१. ऑनवेगबझी, कैथलीन एंथोनी(२००८) वाचनक्षमता हे आफ्रिकन अमेरिकेन पदवीधर विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दिरंगाईचे कारक आहे ERIC Data base on १२.०१.२०१२.

२. ऑनवेगबझी एंथोनी(२०००) सांख्यिकी भीती आणि शैक्षणिक दिरंगाई यामधील संबंध ERIC Data base on १२.०१.२०१२

३. काळे(१९८२), तत्रैव कामिल(२०११) च्या शोधनिबंधातून ''माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याचा कौटुंबिक जीवन अनुभवाचा शाळेच्या प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास''अप्रकाशित शोधनिबंध एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.

४. खाडे(२००७) माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक अभिवृत्ती आणि कौटुंबिक व शालेय वातावरण यांच्या सहसंबंधाचा अभ्यास. एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.

५. परब(२००९-२०११) , मुबंईतील बी.एड्. शिक्षणार्थीचा शैक्षणिक व्याक्षेप स्वसामर्थ्य आणि समायोजन यातील सहसंबंधाचा अभ्यास. एम.फिल. शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.

६. पाधी(१९८९) , तत्रैव कामिल(२०११) च्या शोधनिबंधातून ''माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक जीवन अनुभवाचा शाळेच्या प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास''अप्रकाशित शोधनिबंध एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग मुंबई विद्यापीठ.

७. पावेल आर डी.(१९८९), तत्रैव कामिल(२०११) च्या शोधनिबंधातून ''माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक जीवन अनुभवाचा शाळेच्या प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास.अप्रकाशित शोधनिबंध एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

८. बाईंडर (२०००) ''शैक्षणिक दिरंगाई उपचाराचे विद्यार्थ्यांचे दिरंगाई परिणाम आणि व्यक्तीनिष्ठ कुशल''कार्लेटन विद्यापीठ ऑटोवा ऑनटेरिवो.

९. मुरलीधरन (१९८८), तत्रैव कामिल(२०११) च्या शोधनिबंधातून ''माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक जीवन अनुभवाचा शाळेच्या प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास. अप्रकाशित शोधनिबंध एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

१०. हेंडरसन टी. बेरिया एन.(१९८८), तत्रैव कामिल(२०११) च्या शोधनिबंधातून ''माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्याचा कौटुंबिक जीवन अनुभवाचा शाळेच्या प्रकारानुसार तुलनात्मक अभ्यास. अप्रकाशित शोधनिबंध एम.एड्.शिक्षणशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ.

•••

शिक्षण हे साध्य नव्हे,
ते एक साधन आहे, ज्या शिक्षणाने चारित्र्यवान बनू ते खरे शिक्षण.

- माहात्मा गांधी



Vol:1st , Issue : IV, English-Marathi, Quarterly: 1st March 2013,ISSN : 2319-5525